# प्रेस नोट
## जातीय सलोखा समिती बैठक

जा.क्र. ५६३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०८/२०१७

**भंडारा :–** भंडारा जिल्हा पोलीस दलातर्फे पोलीस मुख्यालय येथील बहुउद्‌देशीय सभागृह येथे दि. ०९/०८/२०१६ रोजी जातीय सलोखा समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हाधिकारी श्री. सुहास दिवसे, सदर कार्यक्रमाचे सचिव जिल्हा पोलीस अधीक्षक मा. विनीता साहु, अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर, यांचे उपस्थितीत कार्यक्रमाची सुरवात ही गुलाबाचे रोपटे देवुन स्वागत समारंभानी झाली.

सदर कार्यक्रमास तसेच प्रमुख पाहुणे उपविभागिय अधिकारी भंडारा पृथ्वीराज बिपी, अर्चना मोरे उपविभागीय दंडाधिकारी साकोली, शिल्पा सोनुले उपविभागीय दंडाधिकारी तुमसर, उपविभागीय पोलीस अधिकारी पवनी श्री. टिक्कस, उपविभागीय पोलीस अधिकारी साकोली श्री. दिसले, उपविभागीय पोलीस अधिकारी तुमसर श्री. साळी, तसेच भंडारा शहर नगराध्यक्ष श्री. सुनील मेंढे, तुमसर नगराध्यक्ष श्री. प्रदीप पडोळे कार्यक्रमाला उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरवात मा. पोनी. सिडाम जिवीशा भंडारा यांच्या प्रास्ताविकतेने केली. त्यांनी आपल्या भाषणात आगामी येणारे सण पोळा, श्रीकृष्ण जन्माष्टमी, गणेश उत्सव, बकरीईद, तसेच लहान मोठे सण उत्सवाला सुरुवात होणार आहे. विविध धर्माचे सण एकापाठोपाठ येत आहेत, त्यामध्ये काही वाद होवु शकतात. त्यासाठी प्रतिष्ठीत नागरीकांनी स्वत: पुढाकार घेवुन शांततेत वाद मिटविला पाहीजे. जातीय सलोखाच्या बैठकीचा उद्‌देश आपल्या प्रास्ताविकतेने सांगितले.

यावेळी बैठकीमध्ये ईश्वरलाल काब्रा ट्रस्टी शितला माता मंदिर यांनी नवरात्री मध्ये शितला माता मंदीरात आरती राहते यावेळी गर्दी होते. तसेच शाळकरी मुले येण्या जाण्या करीता गर्दी होते असल्याने ट्रॉफीक कडे पोलीस विभागाने लक्ष दिले पाहीजे. सर्वानी सण उत्सव शांततेत पार पाडावे. तसेच हिवराज उके जिल्हा सचिव यांनी आपल्या भाषणात दुषीत पाणी समस्या, रस्ता दुर्घटना, तसेच दारुबंदी ई. बाबत माहिती दिली. भंडारा जिल्हा नगराध्यक्ष यांनी आपल्या भाषणात सांगितले की लोकमान्य टिळकांनी गणेशउत्सव सणाला सुरुवात केली. तेव्हा पासुन गणेश उत्सव मोठया प्रमाणात साजरे केले आहे. ते सण साजरे करतांना दुसऱ्याला त्रास होणार नाही. याची दक्षता घेतली पाहीजे.

यावेळी कार्यक्रमाचे सचिव मा. पोलीस अधीक्षक विनीता साहु यांनी सर्व प्रथम सर्वांचे आभार मानले. तसेच येणा–या सणा निमीत्य जिल्हयात शांतता राखण्यास पोलीस प्रशासन सज्ज आहे, सर्व समाज कार्यकर्ते व शांतता समितीच्या अध्यक्षांनी सुध्दा आपल्या परिने शांतता ठेवण्यास सांगितले. जिल्हयात जिथे कुठे काही गुन्हे घडतांना दिसत असेल तर त्वरीत सिटीजन ॲप व प्रतिसाद ॲप किंवा पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथे टोल फ्रि क्र. १०० व १०९१ वर तक्रार सांगुन पोलीस प्रशासनास कळवावे. तसेच गणेश उत्सवांच्या वेळी आवाज जास्त ठेवल्यास तसेच नियम तोडल्यास कलम १५ अन्वये गुन्हा नोदविण्यात येईल व त्यास ३ ते ५ लाख रुपये दंड ३ वर्षाची तुंरुगवासाची शिक्षा होवु शकते. तसेच शिक्षा होऊन सुध्दा असे गुन्हे चालु ठेवल्यास पोलीस कार्यवाही करण्यात येईले. त्याचप्रमाणे बकरीईद व लहान मोठे सण जसे पोळयाला बैलांच्या शर्यती लावतात तसेच श्रीकृष्ण जन्माष्टमीला दंहीहांडी मोठया प्रमाणात साजरे करतात त्यात लहान मुलांचा समावेश असतो याकडे लक्ष दिले पाहीजे गणपती विर्सजन होताच लगेच बकरी ईद असल्याने सर्वानी शांततेत पार पाडावे. गणेशउत्सवांच्या वेळी डी. जे. ठराविक वेळेच्या मर्यादेत पार पाडावे. कोर्टाने जे आदेश दिले. त्यापेक्षा जास्त आवाजात डि. जे. वाजवु नये. याकडे विशेष लक्ष दिले पाहीजे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी जनता व प्रशासनाचे सुसंवाद व्हावे हा या बैठकिचा मुख्य उद्देश असुन सर्वाच्या समस्यांचे निराकरण करण्यात येईल, येणा–या उत्सवांमध्ये सर्वांनी सामंजस्य साधुन कार्य करावे याबाबत सांगितले. एक गाव एक गणपती ही योजना राबवावि. कोणत्याही प्रकारची स्पर्धा ठेवु नये तसेच व्हॉटसप, फेसबुक, यावर चुकीचे फोटो अपलोड करु नये व्हॉटसप चा चांगल्या गोष्टी साठी वापर करावा. मुर्ती विर्सजन करतांना पाणी खराब होत असल्याने प्रदुषण निर्माण होते. मुर्ती विर्सजन करण्यासाठी एक डबका तयार करुन त्यात मुर्ती विर्सजन करावे. स्पर्धा करायची असल्यास चांगल्या कामासाठी करायचे असे बोलेले. महसुल विभाग तसेच पोलीस विभागांना सांगितले की एक गाव एक गणपती तसेच ज्या शासनाने योजना राबवल्या त्या गावात योजना दिसुन आल्या त्या योजने पासुन वंचीत राहणार नाही याकडे विशेष लक्ष दिले पाहीजे. तसेच डॉक्टर विनोद भोयर राशेद कुरेशी साकोली श्रीकृष्ण शिवणकर, डी. जे. साऊड संघाचे सचिव यांनी आपले भाषण व्यक्त केले. पो.स्टे./शाखेचे पोलीस अधिकारी/कर्मचारी, जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, जातीय सलोखा समिती सदस्य, दक्षता समिती सदस्या, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार बंधु व ईतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमामाचे संचालन मपोशि. योगिनी नाकतोडे तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पोलीस उपअधीक्षक (गृह) श्री. कुलकर्णी यांनी केले.

09.8

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.